# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक:- ७१-२२ | दिनांक - ०२/०३/२०२२

## गांजा विक्री करणा-या दोन आरोपीतांना अटक करुन २ किलो गांजा जप्त- वालीव पोलीस स्टेशनची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २८/०२/२०२२ रोजी १५.३५ वाजताचे दरम्यान बाफाने बिटमध्ये मुंबई-अहमदाबाद हायवे रोडवर पोनि/राहुलकुमार पाटील, अधिकारी व अंमलदार पेट्रोलिंग करित असतांना शारदा - मोरी गावातील वास मा-या रेल्वे उड्डाणपुलाच्या १०० मीटर अलीकडे एक निळ्या रंगाची टि. व्हि. एस. कंपनीची **NTORQ** – १२५ विदाऊट नंबर प्लेटची मोटार सायकलवरुन दोन इसम संशयीतरित्या जात असताना मिळुन आल्याने त्यांना थांबवुन चेक केले असता त्यांच्याकडे पांढ-या रंगाच्या गोणीत हिरवट रंगाचा व उग्र वास असलेला झाडाचा पाला सदृश्य चुरा असलेला कॅनाबीस बिज हा अंमली पदार्थ एकुण ०२ किलो ५० ग्रॅम वजनाचा २६ हजार रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ आरोपीत नामे १) समर दयाराम यादव वय २० वर्षे रा. नाईकपाडा, वसई (पुर्व) २) ननका बिरेंद्रकुमार शर्मा वय : २० वर्षे रा. ठि. स्मशानभुमीच्या शेजारी, वालीव, वसई यांच्या ताब्यात मिळुन आल्याने सदर प्रकरणी वालीव पोलीस ठाणे गु.रजि.नं.२३५/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पादार्थ अधिनियम (एनडीपीएस ॲक्ट) कलम ८ (सी), २२ सह मो.वा. अधि. ३(१), १८१.१२९.१९४.३९.१९२ ए (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन सदर गुन्हयामध्ये आरोपीत यांनी वापरलेली निळया रंगाच्या टि. व्हि. एस. कंपनीची **NTORQ** – १२५ विदाऊट नंबर प्लेटची ८०,०००/- रुपये किंमतीची मोटार सायकल व ०२ किलो ५० ग्रॅम वजनाचा २६ हजार रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ असा एकूण- ०१,०६,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पुढील तपास पोउनिरी/चंद्रकांत पाटील हे करत आहेत.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, श्री.राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोउनिरी/ललित वरकडे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, पोना/सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, रुस्तुम राठोड, पो.अंम./गजानन गरिबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.